# "गटां - तटांचे राजकारण आणि कागल मतदार संघ"

**प्रा.विशाल कांबळे,** (M.A, NET,NET-JRF,SET,SET,NET,SET, Ph.D(Appear), (Political Science.)

(राज्यशास्त्र विभागप्रमुख, डि.के.ए.एस.सी.का◌ॅलेज इचलकरंजी.) मो.बा.नं.- 8308462579

---

**प्रास्ताविक-:**

महाराष्ट्राचे बदलते राजकारण या विषयाच्या अंतर्गत "गटा-तटांचे राजकारण आणि कागल मतदारसंघ" या विषयाशी निगडीत संशोधन पेपर राज्यशास्त्र परिषदेमध्ये सादर करत असुन त्यांमध्ये 1962 पासुनच्या निवडणुकांच्या व मतांच्या सांख्यिकीय आकडेवारीसहित कागलच्या राजकारणात बदलत असलेला राजकीय पॅटर्न व सत्तास्पर्धा यांचे राजकीय विश्लेषण सुस्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यांसाठी राजकीय सिद्धांताबरोबरच राजकीय प्रक्रिया या अंगाने वास्तववादी व अनुभववादी दृष्टीकोणाबरोबरच मतांच्या आखडेवारीसाठी भारतीय निवडणुक आयोगाचे 1962 पासुण ते 2019 पर्यतच्या सार्वत्रिक निवडणुकांचे स्टँटीस्टीकल रिपोर्ट यांनुसार सदर संशोधन पेपरमध्ये विश्लेषण केले आहे. तसेच सत्तेच्या सिद्धांताबाबत राजकारणाचा बदलत असलेला पॅटर्न आणि गटा-तटांचे राजकारण याची चर्चा केवळ कागल मतदार संघ आणि त्याच्याशी निगडीत कोल्हापुर लोकसभेशी केंद्रित असुन या संशोधन पेपरच्या अभ्यासाची मर्यादा निश्चित करते.

**उद्दीष्टे -:**

1) कागल मतदारसंघातील विधानसभा व लोकसभा निवडणुकांचा आढावा घेणे.
2) कागलमधील गटा-तटांचे राजकारण अभ्यासने.
3) प्रथम व द्वितीय स्थानी असलेल्या उमेदवारांच्या मतांचे आखडेवारीसहित विश्लेषण करणे.
4) कागलच्या राजकारणांतील 'घाटगे - मंडलिक गट पॅटर्न' यांबरोबच इतर गटांचे पॅटर्न समजावुन घेणे.
5) संभाव्य राजकीय पॅटर्न यांमध्ये लोकसभा - विधानसभेवर कोणाचे वर्चस्व असेल याचे विश्लेषण करणे.

**गृहितके-:**

1) कागल मतदारसंघातुन विधानसभा व लोकसभा निवडणुकांचा आढावा घेण्यात आला.
2) कागल मध्ये गटा -तटांची प्रतिस्पर्धा अधिक तिव्र आहे.
3) प्रथम व द्वितीय स्थानी असलेल्या उमेदवारांच्या मतांचे आखडेवारीसहित विश्लेषण केले.
4)घाटगे - मंडलिक गट पॅटर्न यांतुन मुश्रीफ -घाडगे पॅटर्न उदयास आला.
5) कोल्हापुर लोकसभेवर आतापर्यत कागलचे वर्चस्व निर्माण झाले आहे.

वरीलप्रमाणे संशोधनाची उद्दीष्टे, गृहितके व मर्यादा लक्षात घेवुन "गटा-तटांचे राजकारण आणि कागल मतदारसंघ" यांविषयी संशोधन पेपरची विश्लेषणात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

व्यक्ती ही कुटुंबसंस्था,समाजसंस्था, व राज्यसंस्था तथा सर्वच पातळीवर आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे म्हणजेच, निर्णय घेण्याची क्षमता माझेकडे असावी यासाठी प्रयत्न करत असतात. तसेच व्यक्तीमध्ये, व्यक्तीच्या विविध गटामध्ये, मंडळामध्ये, संघामध्ये किंवा राज्या-राज्यामध्ये असलेले ते एक नाते म्हणजे प्रभाव होय असे रा◌ॅबर्ट डाल या विचारवंताने म्हंटले आहे. तशाप्रकारचा प्रभाव पाडण्याचे कार्य प्रत्येकजन करत असतो. त्यांमूळे 'एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्ती समुहांच्या वर्तनावर बदल घडवुन आणण्याची क्षमता ज्याच्याकडे असते त्यास सत्ता' असे म्हणतात असे राज्यशास्त्रीय परिभाषेत संकल्पना स्पष्ट केली जाते. त्यांमुळे राजकारण विशेषता शब्द सत्तेसंदर्भात निगडीत असल्याने कुटुंबसंस्था,समाजसंस्था व राज्यसंस्था या सर्वच क्षेत्रात प्रत्येक जन सत्ता मिळविण्यासाठी किंवा वर्चस्व आपल्या ताब्यात असावे यासाठी प्रयत्न करत असतो. याचे वर्णन राज्यशास्त्रीय परिभाषेत 'सत्तेसाठी चाललेला संघर्ष म्हणजे राजकारण' ही व्याख्या व्यापक अर्थाने वापरली जाते. हे राजकीय सिद्धांत रुपाने जितके खरे आहे तितकेच व्यवहारिक दृष्ट्या तंतोतंत त्याचा वापर राजकारणात होताना दिसत आहे. प्रत्येक राजकीय पक्षाचे ध्येय हे अंतिमता सत्ता संपादन करणे हेच असते. कोणताही राजकीय पक्ष 'तो आंम्हाला सत्ता नको' असे म्हणत नसतो.'हितबंधासाठी शेवटच्या क्षणापर्यत लढा देणारा नेता व नेतृत्त्व हाच अनुयायांच्या दृष्टीकोनातुन नेतृत्त्वाचा गाभा असतो". हे मात्र खरे आहे. या राजकीय सिद्धांताच्या व राज्यशास्त्राच्या दृष्टीकोणातुन कागल मतदार संघातील राजकारणाचा परामर्श घेतला असता यातुन अनेक कंगोरे पुढे येताना दिसतात.

**कागल विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकांतील मताधिक्कांचा आढावा-:**

महाराष्ट्र विधानसभेच्या 1962 ते 2019 पर्यतच्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत भारतीय निवडणुक आयोगाच्या स्टॅटीस्टिकल रिपोर्ट नुसार कागल मतदारसंघातील 1962 ते 2019 पर्यतच्या प्रथम व दुस-या स्थानी असणा-या व विजयी उमेदवारांच्या मतांची आकडेवारी सांगता येईल. कागल विधानसभा मतदार संघामध्ये प्रामुख्याने 1962 च्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार शामराव भीवाजी पाटील यांना 20,739 मते पडली. ते 8,437 मतांनी विजयी झाले. दुस-या स्थानी अपक्ष उमेदवार सदाशिव दादु मंडलिक यांना 12,292 मते पडली. 1967 साली काँग्रेसचे पक्षाचे दौलतराव ए.निकम यांना 32,789 मते पडली. ते 6,482 मतांच्या फरकाने विजयी झाले. दुसया-या स्थानी अपक्ष उमेदवार जे.जी.सावंत यांना 26,307 मते पडली. सन 1972 च्या निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार सदाशिवराव मंडलिक यांना एकुण 34,608 मते मिळाली. ते 1,624 मतांनी विजयी झाले.

तर दुस-या स्थानी का ॅंग्रेस पक्षाचे उमेदवार दौलतराव निकम यांना एकुण 32,984 इतकी मते मिळाली. 1978 साली अपक्ष उमेदवार विक्रमसिंह घाटगे यांना एकुण 35913 मते मिळाली. ते 11,434 मतांच्या फरकाने विजयी झाले. तर दुस-या स्थानी अपक्ष उमेदवार सदाशिवराव मंडलिक यांना एकुण 24,479 मते मिळाली व त्यांचा पराभव झाला. सन 1980 मध्ये निवडणुकीत काँग्रेस आय पक्षाचे उमेदवार विक्रमसिंह घाटगे यांना एकुण 44,348 इतकी मते मिळाली आणि ते 6,607 मतांनी विजयी झाले. तर दुस-या स्थानी काँग्रेस युनायटेड पक्षाचे उमेदवार सदाशिवराव मंडलिक यांना एकुण 37,741 मते मिळाली व त्यांचा पराभव झाला. 1985 साली कागल विधानसभा निवडणुकीत भारतीय काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाचे उमेदवार सदाशिवराव मंडलिक यांना एकुण 46,298 इतकी मते मिळाली. आणि ते केवळ 231मतांनी विजयी झाले. काँग्रेस(आय) चे उमेदवार विक्रमसिंह घाटगे यांना एकुण 46,067 इतकी मते मिळाली व त्यांचा पराभव झाला. सन 1990 च्या कागल विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार सदाशिवराव मंडलिक यांना एकुण 58,100 इतकी मते मिळाली व ते 6,504 मतांनी विजयी झाले. तर दुस-या स्थानी जनता दलाचे उमेदवार संजय घाटगे यांना एकुण 51,596 मते मिळाली व त्यांचा पराभव झाला. सन 1995 मध्ये कागल विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार सदाशिवराव मंडलिक यांना एकुण 71,127 मते मिळाली. आणि ते 10,923 मतांनी विजयी झाले. तर अपक्ष उमेदवार विक्रमसिंह घाटगे यांना एकुण 60,204 इतकी मते मिळाली व त्यांचा पराभव झाला. सन 1999 मध्ये कागल विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार हसन मुश्रीफ यांना 67,610 इतकी मते मिळाली आणि ते 2,881 मतांनी विजयी झाले. तर दुस-या स्थानी राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार संजय घाटगे यांना 64,729 इतकी मते मिळाली व त्यांचा पराभव झाला. 2004 साली झालेल्या कागल विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार हसन मुश्रीफ यांना 79,533 इतकी मते मिळाली आणि त्यांचा 1,125 मतांनी विजयी झाला. तर दुस-या स्थानी शिवसेना पक्षाचे उमेदवार संजय घाटगे यांना एकुण 78,408 इतकी मते मिळाली व त्यांचा निसटता पराभव झाला. 2009 साली कागल विधान सभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे उमेदवार हसन मुश्रीफ यांना एकुण 1,04,241 इतकी मते मिळाली आणि ते 46,412 इतक्या मतांनी विजयी झाले. तर अपक्ष उमेदवार संजय मंडलिक यांना एकुण 57,829 इतकी मते मिळाली व त्यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. सन 2014 च्या कागल विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार हसन मुश्रीफ यांना एकुण 1,23,626 मते मिळाली आणि ते 5,934 मतांनी विजयी झाले. तर दुस-या स्थानी शिवसेना पक्षाचे उमेदवार संजय घाटगे यांना एकुण 1,17,692 इतकी मते मिळाली; मात्र त्यांचा पराभव झाला. सन 2019 च्या कागल विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे उमेदवार हसन मुश्रीफ यांना एकुण 1,16,436 इतकी मते मिळाली. आणि ते 28,133 मतांनी विजयी झाले. तर दुस-या स्थानी अपक्ष उमेदवार समरजीतसिंह घाटगे यांना एकुण 88,303 इतकी मते मिळाली. तसेच तिस-या स्थानी शिवसेना पक्षाचे उमेदवार संजय घाटगे यांना एकुण 55,657 इतकी मते मिळाली; मतांची विभागणी मोठ्या प्रमाणात झालेमुळे या दोघांचा पराभव झाला.अशाप्रकारे कागल विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांची सन 1962 ते 2019 या कालावधीचा आढावा मतांनुसार घेतला असता कागलच्या राजकारणात विधानसभा निवडणुकांमध्ये राजकीय पक्षीय व अपक्ष या स्वरुपाची वाटचाल 1962 च्या निवडणुकीपासुन ते 2019 पर्यतच्या विधानसभांच्या निवडणुकीत बलाबल हे प्रथम व दुस-या क्रमांकाची मते ही कमी अधिक फरकाने उमेदवार निवडुन आलेले दिसतात. व त्या - त्या गटांची गणिते बदललेली दिसतात.

कागल तालुक्याच्या राजकारणात सुरुवातीस 1962 व 1967 मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अनुक्रमे शामराव पाटील व दौलतराव निकम आमदार बनले होते. येथे काँग्रेसचे वर्चस्व निर्माण झाले. मात्र असे असले तरी 1962 च्या निवडणुकीपासुनच सदाशिवराव मंडलिक यांनी अपक्ष म्हणुन सहभाग घेतला होता व ते 8,437 मतांनी पराभुत झाले होते. हे मात्र ते नंतरच्या काळात अधिक सक्रियतेने बांधणी केलेले दिसतात. कारण 1972 च्या निवडणुकीत सदाशिवराव मंडलिक यांनी अपक्ष राहुन पहिल्यांदाच काँग्रेसच्या तत्कालिन आमदार दौलतराव निकम यांना पराभुत करुन 1,624 मतांनी विजय संपादन केले. पहिल्यांदाच ते अपक्ष आमदार म्हणुन निवडुन आले. 1978 च्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष मागील निवडणुकी प्रमाणे पाठीमागे पडला आणि विक्रमसिंह घाटगे व सदाशिव मंडलिक या दोन्ही अपक्षांमध्येच लढत केद्रस्थानी ठरली तेव्हा विक्रमसिंह घाटगे यांनी विजय संपादन केला. तसेच 1980 च्या निवडणुकीत देखील काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून असे ते विजय प्राप्त करुन सलग दोन वेळा ते कागलचे आमदार बनले. 1985 मध्ये भारतीय काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाचे उमेदवार व 1990 मध्ये भारतीय काँग्रेसचे उमेदवार म्हणुन अनुक्रमे भारतीय काँग्रेस(आय) चे उमेदवार तत्कालिन आमदार विक्रमसिंह घाटगे यांचा पराभव झाला. व पुढे 1995 साली देखील त्यांचा अपक्ष म्हणुन देखील पराभव झाला. तसेच 1995 मध्ये जनता दलाचे उमेदवार संजय घाटगे यांना पराभुत करत कागल विधान सभा मतदार संघाचे आमदार म्हणुन सलग तीन टर्म प्रतिनिधीत्त्व केले. 1972,1985,1990,1995 अशा चार टर्म कागलच्या राजकारणात अपक्ष व काँग्रेस पक्षाच्या सहाय्याने आपले प्रतिनिधीत्त्व सदाशिवराव मंडलिक यांनी सिद्ध केले. 1998 व 1999 च्या लोकसभा निवडणुकीत सदाशिवराव मंडलिक यांनि केंद्रिय राजकारणात शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली सामिल झालेनंतर 1999 ते 2019 या कालावधीत 1999, 2004, 2009, 2014 व 2019 सालच्या कागल विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणुन पुढे हसन मुश्रीफ यांनी सलग पाच टर्म या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. व त्यांनी अनुक्रमे 1999 मध्ये अपक्ष असणा-या व 2004 साली शिवसेना पक्षाचे उमेदवार असणारे संजय घाटगे यांचा सलग दोनवेळा कमि अधिक फरकाने पराभव केला. तर 2009 साली अपक्ष असलेले संजय मंडलिक, 2014 साली शिवसेना पक्षाचे उमेदवार असलेले संजय घाटगे यांना पराभुत केले. तर 2019 सालच्या निवडणुकीत तिरंगी लढतीत अपक्ष उमेदवार समरजीतसिंह घाटगे व शिवसेनेचे उमेदवार संजय घाटगे यांचा पराभव झाला. यांमध्ये

मतांची विभागणी झालेने सलग पाच टर्म आमदार होण्याचे रेकॉर्ड हसन मुश्रीफ यांनी कागल मतदारसंघात केले आहे असेच म्हणावे लागेल.

**व्यक्ती तथा गट केंद्रित राजकारण-:**

कागलच्या राजकारणात सत्तेसाठी राजकीय वर्तन हे बदलताना दिसते यातुन त्यांचे राजकीय कार्य समोर येते. दबाव गटांचा अभ्यास करणा-या डेव्हिड लॅथॅम या विचारवंताने "सत्तेच्या निरनिराळ्या रचनांतून (Structures of Power) मूल्यांचे वाटप करू पाहणारी सामाजिक प्रक्रिया म्हणजे राजकीय कार्य अशी संकल्पना मांडली आहे. म्हणजेच एकमेकांशी संघर्ष - समन्वय करु पाहणा-या, सत्तेच्या माध्यमातून स्वताची उद्दीष्टे साध्य करू इच्छिणा-या गटाचे वर्तन म्हणजे राजकीय वर्तन अशी राजकीय आणि सामाजिक प्रक्रियाच्या बाबतीत ज्याप्रमाणे कल्पना मांडली आहे. त्यांप्रमाणे कागल मधील गटांतटांचे राजकीय वर्तन हे सामाजिक व राजकीय प्रक्रियेत बदलताना दिसत आहे. जरी असे असले तरी गट नेतृत्वांच्या वर्चस्वाने व्यक्ती तथा गट केंद्रित राजकारण पहावयास मिळते. त्यांमुळे वरीलप्रमाणे पक्षीय व अपक्ष या स्वरुपाने कागल मतदार संघातील विधानसभा निवडणुकांचे मतांची आखडेवारी पाहता पक्षाचे वर्चस्व यांपेक्षा कागलची जनता गटा -तटांच्या राजकारणात जास्त स्वारस्य बाळगुन व्यक्तीविशेषा भोवतीच संपुर्ण राजकीय लोकमत केंद्रीत करताना दिसते. जरी असे असले तरी नेतृत्वाचे व्यक्तीगत नेतृत्व आणि विशिष्ट गटलक्ष्यी नेतृत्व असे दोन प्रारुपापैकी गटलक्ष्यी नेतृत्व यांमध्ये गटाच्या हितसंबंधाचा दावा केला जातो. गटांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. त्यांमुळे "गटांमध्ये तीव्र राजकीय स्पर्धा असते. गटांमधुन राजकीय प्रतिनिधित्व मिळवले जाते. "कोण", "कोणत्या" गटाचा आहे, "कोणत्या" नेत्याच्या गटामधून कोणाला उमेदवारी मिळते अशा गोष्टी राजकारणात घडतात". अशा प्रकारचे प्रारुप येथे दिसुन येत असला तरी ते व्यक्तीकेंद्रीत असुन नेत्याला महत्व अधिक आहे. त्या विशिष्ट नेत्यांचा गट याप्रकारचे प्रारुप कागलच्या राजकारणात पहावयास मिळते. त्यांमुळे त्या नेत्यांच्या गटांच्या प्रभावी सामर्थ्य यांवर किंवा व्यक्तीची परिणामी नेत्याचे प्रभुत्व तेथील राजकीय पक्षाला मान्य करावे लागते हेच एक वैशिष्ट प्रकर्षाने कागलच्या राजकारणात जाणवते. कारण 1962 पासुन काही अपवाद सोडले तर प्रामुख्याने सुरुवातीपासुन ते 2009 पर्यत या गटा-तटांच्या राजकारणात दोन गट अधिक प्रभावी बनलेले दिसतात. यांमध्ये विक्रमसिंहराजे घाटगे हे राजर्षी शाहू यांचे चुलत नातू असल्याने थेट राजघराण्याशी निगडीत होते. कागलच्या शाहू सहकारी साखर कारखान्याची स्थापना त्यांनी 1980 साली केली. हा कारखाना यशस्वीरीत्या कार्यरत करुन साखर कारखानदारीमध्ये 'शाहू पॅटर्न' निर्माण केला होता. सन 2005 साली ते राज्य सहकारी साखर संघाचे अध्यक्ष बनले होते. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे संचालक या पदावर काम पाहिले. कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणातही विक्रमसिंह घाटगे यांच्या सहकार चळवळीमुळे वलय निर्माण झाले. काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना असा त्यांचा राजकीय प्रवास झाला. 1978 साली अपक्ष व 1980 साली काँग्रेसचे कागल विधानसभा मतदारसंघात आमदार म्हणून निवडुन आले. राज्यात युतीचे शासन असताना घाटगे यांनी कोल्हापूर लोकसभेची निवडणूक शिवसेनेकडून लढविली होती. विक्रमसिंह घाटगे यांच्या नेतृत्वाखालील त्यांच्या विचार, आचार, व कृती द्वारे आणि सहकारी संस्थात्मक बांधणीतुन कागलच्या राजकारणात 'घाटगे गट' नावाचा गट उदयास येवुन तो प्रभावीपणे सक्रीय झाला. तर दुस-या बाजुने सदाशिवराव मंडलिक हे 1972, 1985, 1990, 1995 या काळात चार वेळा आमदार झाले. तर 1998, 1999, 2004, 2009 साली चारवेळा खासदार बनले. थोडक्यात लोकमताची व्याख्या सांगत असताना ते एच.एल.चाईल्डस या विचारवंताने असे म्हंटले आहे, कि "समुहाच्या सदस्यांनी वा लोकांनी शब्दात अभिव्यक्त केलेल्या आपल्या अभिवृत्ती म्हणजे लोकमत होय". असे म्हंटले आहे त्यांप्रमाणे कागलच्या राजकारणात त्या-त्या गटांमध्ये जनतेचे लोकमत अधिकाधिक तिव्रपणे निर्माण होताना दिसते. त्यांमुळे गट हा आपल्या नेतृत्वाच्या आचारांना व विचारांना सर्वस्व मानुन राजकीय प्रतिस्पर्धा कायमपणे बाळगताना दिसतात. हे एक वैशिष्ट्य होय.

कोल्हापुर लोकसभा मतदारसंघावर मंडलिक गटाचे तथा कागलचे वर्चस्व-:

साधारणता अनुक्रमे 1998 च्या 12 व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोल्हापुर लोकसभा मतदार संघातुन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणुन सदाशिवराव मंडलिक यांना 3,67,951 इतकी मते घेवुन त्यांच्या विरोधात असणा-या शिवसेना या पक्षाचे उमेदवार विक्रमसिंह घाटगे यांना 3,06,353 इतके मते मिळाली व त्यांचा 61,551 मतांच्या फरकाने पराभव केला. 1999 च्या तेराव्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोल्हापुर लोकसभा मतदारसंघातुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणुन सदाशिवराव मंडलिक यांना 3,46,459 इतके मते मिळाली व त्यांनी 1,08,910 इतक्या मतांच्या फरकाने विजयी होवुन त्यांच्या विरोधात असणा-या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार उदयसिंगराव गायकवाड यांचा पराभव केला. तेव्हा गायकवाड यांना 2,37,549 इतके मते मिळाली. 2004 च्या चौदाव्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोल्हापुर लोकसभा मतदारसंघातुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणुन सदाशिवराव मंडलिक यांना 4,01,922 इतके मते मिळाली व त्यांनी 14,753 इतक्या मतांच्या फरकाने विजयी होवुन त्यांच्या विरोधात असणा-या शिवसेना पक्षाचे उमेदवार धनंजय महाडिक यांचा पराभव केला. त्यावेळेस धनंजय महाडिक यांना 3,87,169 इतके मते मिळाली.

2009 साली सदाशिवराव मंडलिक यांचे पक्षांतर्गत शरद पवार यांचेशी तीव्र मतभेद झालेने त्यांनी बंडखोरी केली. आणि कोल्हापुरची स्वाभिमानी जनता आपला स्वाभिमान जोपासेल या हेतुने 'तत्वाशी एकनिष्ठ असणारा नेता विरुद्ध आपल्या पक्षाचे पक्षप्रमुख तथा सर्वेसर्वा ' अशी प्रतिष्ठेची निवडणुक ठरली. तेव्हा 2009 च्या पंधराव्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोल्हापुर लोकसभा मतदारसंघातुन अपक्ष उमेदवार म्हणुन सदाशिवराव मंडलिक यांना 4,28,082 इतके मते मिळाली. त्यांनी प्रतिष्ठेची

ठरलेल्या कोल्हापुर लोकसभेच्या निवडणुकीत आपला विजयश्री खेचुन आणला. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार संभाजीराजे छत्रपती यांना 3,83,282 इतके मते मिळाली. तर शिवसेना पक्षाचे उमेदवार विजय देवणे यांना 1,72,822 इतके मते मिळाली. सदाशिवराव मंडलिक यांनी या दोघांचाही पराभव अनुक्रमे संभाजीराजे छत्रपती यांचा 44,800 मतांच्या फरकाने तर विजय देवणे यांचा 2,55,260 इतक्या मतांच्या फरकाने दोघांचाही पराभव केला. यातुन कागलच्या राजकारणात तथा कोल्हापुरच्या राजकारणात तत्कालिन खासदार सदाशिवराव मंडलिक यांचे विचार, आचार, व कार्य करण्याची पद्धत, आणि सहकारी संस्थात्मक बांधणी यांवर आधारित पकड मजबुत होवुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्ष नेतृत्वास मोठे आव्हान देवुन बंड केल्याने कागलच्या राजकारणात 'मंडलिक गट' म्हणुन जसा तो नावारुपास आलेला होता तसाच तो अधिकाधिक राजकारणात सक्रीय बनला. 2014 च्या सोळाव्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कोल्हापुर लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार धनंजय महाडिक यांना 6,07,665 इतकी मते मिळाली. त्यांच्या विरोधात मंडलिक गटाचे तथा शिवसेना पक्षाकडुन असलेले उमेदवार संजय मंडलिक यांना 5,74,406 इतकी मते मिळाली. संजय मंडलिक यांचा 33,259 इतक्या मतांच्या फरकाने पराभव झाला. तर पुढे 2019 च्या सतराव्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोल्हापुर लोकसभा मतदार संघातील शिवसेना या पक्षाचे उमेदवार असणारे संजय मंडलिक यांना 7,49,085 इतकी मते मिळाली. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार धनंजय महाडिक यांना 4,78,517 इतकी मते मिळाली. महाडिक यांचा 2,70,568 इतक्या मोठ्या मतांच्या फरकाने पराभव झाला. यापाठीमागे मंडलिक गटाला अंतर्गत मुश्रीफ गटाचे पाठबळ मिळाल्यानेच संजय मंडलिक यांचा विजय होण्यास मार्ग सुकर झाला. अशा चर्चा देखील त्यावेळेस चर्चिल्या गेल्या. अर्थात 2014 च्या लोकसभेचा अपवाद वगळता सातत्याने कोल्हापुर लोकसभा मतदारसंघावर 1998,1999, 2004, 2009, 2019 कागलचे परिणामी मंडलिक गटाचे वर्चस्व आजतागायत प्रस्थापीत झाले आहे.

**घाटगे - मंडलिक गटांचा पॅटर्न आणि टोकाचे राजकारण व फाटाफुट-:**

वरील दोन राजकीय गटांची तौलनिकता पाहिली असता 'घाटगे गट' व 'मंडलिक गट' यांच्यात, नेतृत्वाचे वलय, विचारधारा, कृती, सहकार संस्थात्मक बांधणी, पाणीपुरवठा संस्था, सहकारी तथा साखर कारखाण्याची भुमीका, या सर्वांच्या माद्यमातुन कागल मतदार संघातील विविध गावांच्या विकासामध्ये होत असलेले योगदान या सर्वामध्ये सकारात्मक एकसुत्रता दिसुन येते. याचा संपुर्ण कागलच्या राजकारणावर परिणाम होवुन केवळ एखाद्या राजकीय पक्षापेक्षा या गटांच्या नेतृत्वांवर जनतेचा अधिकाधिक विश्वास दृढ झालेला आहे. हे एक कागलच्या राजकीय विद्यापीठाचे आणखी वैशिष्ट समोर येते. तसेच एका बाजुला फुले, शाहु, आंबेडकरांची विचारधारा आत्मसात करुन कागलमध्ये राजकीय उलथापालथ झालेल्या आहेत. यांमध्ये मग त्या सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्ती असणारी सदाशिवराव मंडलिक विरुद्ध राजे विक्रमसिंह घाटगे, "प्रजा विरुद्ध राजा " अशी घोषवाक्ये तत्कालीन परिस्थितीत उदयास आली गेली. कागलच्या राजकारणात घाटगे गट विरुद्ध मंडलिक गट असे परस्पर प्रतिस्पर्धी गट अधिक प्रभावीपणे राजकारणात सक्रीय होवुन कार्यरत झाले. एवढेच नव्हे तर सहकार संस्था, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, विधानसभा, लोकसभा अशा सर्व प्रकारच्या निवडणुकीत हे गट ज्यांप्रमाणे आमने -सामने प्रतिस्पर्धी म्हणुन सक्रीय व्हायचे त्याप्रमाणेच गटा - तटांच्या या राजकारणात काही गावांत सख्खे भाऊ देखील दोन गटांत असले तर त्यांचे या निवडणुकांच्या काळात परस्पर संवाद तथा बोलणे देखील टाळायचे. इतकी प्रत्येकांची आपापल्या गटांवर आणि गटनेतृत्वावर विश्वास व निष्ठा असायची. याचे वर्णन आपल्याला राज्यशास्त्राच्या अभ्यासातील मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञ तथा विचारवंताने सत्तेच्या संदर्भात 'दिव्यवलंयाकित अधिसत्तेचा' प्रकार स्पष्ट केला आहे. या सदर्भात देता येतो. त्याच्या मतानुसार 'दिव्य वलयांकित अधिसत्ता म्हणजे एखाद्या व्यक्तीची, किंवा व्यक्तीमत्त्वाची मोहिणी लोकांच्यावर प्रभाव टाकते व जनतेचे त्या व्यक्तीवर, नेतृत्वावर विश्वासाने दिव्यवलय निर्माण होते आणि त्या नेतृत्वाचे लोक ऐकत असतात त्यांस दिव्यवलयांकित अधिसत्ता असे म्हंटले आहे'. अशाचप्रकारे कागलच्या राजकारणात सुरुवातीस 'घाटगे गटातील नेतृत्व' व 'मंडलिक गटातील नेतृत्व' यांसभोवताली दिव्यवलय प्राप्त झालेमुळे विक्रमसिंह घाटगे व सदाशिवराव मंडलिक या नेतृत्वांचा प्रभाव जनतेवर पडलेला दिसतो. या दोन्हि गटांनी आपापल्या कार्यक्षेत्रात सहकाराच्या विस्तारातुन, पाणीपुरवठा संस्था, विविध सोसायट्या, सहकारी पतसंस्था, ईत्यादी संस्था यांच्या कार्यक्षेत्राचे विस्तार करत कागल मतदारसंघातील विविध गावोगावी विकास करण्याचा प्रयत्न व आपापल्या पद्धतीने लोकमत मिळविण्याचा प्रयत्न केला गेला. आज देखील हे गट प्रभावी बनलेले असताना यातुन व्यक्तीवलय निर्माण झालेने मंडलिक गटातुन मुश्रीफ गटाची निर्मिती झाली. तर घाटगे गटातुन संजयबाबा यांनी बाहेर पडुन स्वताचा एक बाबा गट निर्माण केलेला आहे. सध्या मंडलिक गटाचे नेतृत्त्व संजय मंडलिक हे करत आहेत, घाटगे गटाचे राजे गट म्हणुन समरजीतसिंह घाटगे नेतृत्त्व करत आहेत. त्यांमुळे गटांतटांच्या राजकारणात कागलमध्ये पक्षिय बलाबलपेक्षा मुश्रीफ गट, बाबा गट, मंडलिक गट व राजे गट अशा चार गटांचे वर्चस्व आपापल्या सहकारसंस्था, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, विधानसभा व लोकसभेच्या निवडणुंकांमध्ये ताकद आजमावण्याचा प्रयत्न करताना दिसतात. ते देखील पक्षीय बळकटीपेक्षा आपापल्या गटांच्या बळकटीवर अधिक जोर देताना दिसतात. यातुनच पाहीले असता मागील 20-22 वर्षांपासून विद्यमान आमदार हसन मुश्रीफ हे कागलचं प्रतिनिधित्व करत आहेत.

**बदलणारे सत्तासमीकरण - सत्तापरिवर्तनाच्या दिशेने व नाराजांची भुमिका-:**

कागलच्या राजकारणात "सत्ता ही प्रत्येक व्यक्तीला हवी असते. समाज कोणताही असला म्हणजे तो प्रगत असला काय नि अप्रगत असला काय, दोन्ही समाजात व्यक्तीला आपली सत्ता दुस-याने तत्त्वत: मानावी अशी अपेक्षा असते" यांप्रमाणे गटांची

प्रतिस्पर्धा सत्ता आपल्याच गटाच्या ताब्यात राहावी यासांठी घाटगे गट, मुश्रीफ गट, घाडगे गट, मंडलिक गट सातत्याने प्रयत्न करताना दिसतो. त्यांमुळे कागल हा हसन मुश्रीफ यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असला तरी वरीलप्रमाणे अन्य गट देखील अधिक प्रभावी आहेत हे आपल्याला नाकारता येत नाही. राजकीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून कागल तालुक्याची ओळख आहे. त्यांमुळेच येथील विकासकामात श्रेयवादाचे राजकारण केले जाते. प्रत्येक विकासकामाचे उद्धाटन करुन त्या कामाचे श्रेय घेण्यासाठी येथे गटातटात प्रतिस्पर्धा देखिल पहावयास मिळते. त्यामुळे एकाच कामाचं चार चार वेळा उद्धाटन या तालुक्यातील जनतेने पाहिलेले आहे. यामुळे येथील विकासकामांच्या बाबतीत येथील जनतेत संभ्रमाचे वातावरण कधी कधीतर दिसते. विद्यमान आमदार व मंत्रि हसन मुश्रीफ जनता दरबाराच्या माध्यमातून येथील जनतेशी संपर्कात राहतात तर त्यांचे प्रतिस्पर्धी संजय घाटगे हे सहकार क्षेत्राच्या माध्यमातून मतदारांच्या संपर्कात राहतात. त्याचाच भाग म्हणुन 2019 साली पराभव झालेला असताना देखील विजयी मिरवणुकीत सामील होवुन गैबी चौकातील सभेत हसन मुश्रीफ यांना शुभेच्छा देवुन संजय घाटगे यांनी विकास कामास पाठींबा दर्शवुन या कागलच्या राजकीय विद्यापीठाचे एक वैशिष्ट्य दाखवुन दिले. मागील निवडणूकीत सर्वच पक्ष स्वतंत्र निवडणूक लढले होते. आता मात्र हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रवादीतील बंडाला जाहीर पाठींबा देवुन अजित पवारांसोबत भाजपशी हातमिळवणी केल्यामुळे राजकीय गणिते देखील तेवढ्याच ताकदीने बदलताना दिसत आहेत. या बदललेल्या समीकरणामुळे कागलच्या राजकारणात नेहमी त्यांचे प्रतिस्पर्धी व विरोधी भुमिका असणा-या राजकीय नेत्यांमध्ये या घटनाक्रमांमुळे नाराजी निर्माण झाली. त्याचाच एक भाग म्हणुन भाजपशी हातमिळवनी केल्याने व हसन मुश्रीफ यांना मिळालेले मंत्रिपद हे भाजपचे तथा समरजित घाटगे यांना व त्यांच्या स्थानिक बहुतेक कार्यकर्त्यांना रुचलेले नाही. हे देखील खरे असले तरी दुस-या बाजुला हसन मुश्रीफ यांनी अजित पवार गटासोबत भाजपच्या सत्तेत सामिल झालेला निर्णय हा काही कार्यकर्त्यांना आवडलेला असला तरी बहुतेक दलित, OBC कार्यकर्त्यांना व बहुतांश जनतेला हा निर्णय आवडलेला नसावा. अशा खासगी चर्चेत त्यांची मत मतांतरे प्रकट होताना दिसत आहेत. तसेच इतरांची देखील नाराजी वाढताना दिसत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटाच्या जाहिर सभा विविध भागात होत असताना कोल्हापुर येथे जी सभा झाली त्यांमध्ये तो प्रत्यय आला. या सभांमध्ये अजित पवार हे राजकीय टिकाटिपण्णी पासुन जास्त टार्गेट होत नसले. तरी त्यांच्या सोबत गेलेले इतर राजकीय नेते यांच्यावर मात्र जोरदार राजकीय टिका टिपण्णी होताना दिसत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे कोल्हापुरच्या सभेत बंडखोरांना चांगले कोल्हापुरी दाखविण्याचा प्रयत्न या सभेतुन उच्छारण्यात आला. याचाच अर्थ अजित पवार यांची बाजु घेवुन गेलेल्या बंडखोरांवर प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. त्याचाच भाग म्हणजे कोल्हापुरातील नाराज असलेले सर्व स्थानिक नेते हे देखील मंत्रि हसन मुश्रीफ यांच्याविषयी आता उघड-उघड व्यासपीठावर आपली नाराजी व्यक्त करुन शरद पवार यांना पाठींबा देत होते. या सबंध राजकीय घडामोडीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कारण याचा परिणाम कागलच्या राजकारणावर जसा होणार आहे तसाच तो कोल्हापुर जिल्ह्यातील हसन मुश्रीफ यांच्या वर्चस्वाला आव्हान देण्यास व प्रतिबंध करण्यास देखील निखराचे प्रयत्न होवु शकतात हे देखील नाकारता येत नाहि. कारण शरद पवार गटाच्या या कोल्हापुरच्या सभेतुन कागलच्या राजकीय प्रस्थापित नेतृत्व म्हणजेच हसन मुश्रीफ हेच राजकीय टिकाटिपण्णीवर टार्गेट ठरले. शरद पवार यांनी तर त्यांच्या वैयक्तिक इडी चौकशी संदर्भात प्रश्न उपस्थित करुन सत्यता असल्यानेच ते भाजप मध्ये गेले असावे? व चौकशीचे काय झाले असे प्रश्न उपस्थित केले. सभेचे अध्यक्ष शाहु महाराज छत्रपति यांनी हसन मुश्रीफ यांना कोल्हापुरच्या जनतेने आता जाब विचारावे यांसारखे प्रश्न उपस्थित केले. काही कालांतराने याचे उत्तर देण्यासाठी अजित पवार गटाची सभा देखील कोल्हापुर मध्ये मुश्रीफांनी आयोजित केली होती. त्यासभेत सर्वच अजित पवार गटाच्या नेतेमंडळींनी हसन मुश्रीफांची बाजु घेण्याचा प्रयत्न केला गेला. असे असले तरी सजय घाटगे व अमरिष घाटगे पिता पुत्रांनी शरद पवार यांच्या सभेवेळी शरद पवार याची घेतलेली भेट असुद्या किंवा समरजित घाटगे यांची मुश्रीफांविषयीची भुमिका व संजय मंडलिक यांची भुमिका याबाबत कागलचे राजकारण बदलताना दिसेल. भविष्यात खासदार संजय मंडलिक व राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक, आणि आमदार सतेज पाटील यांची भुमिका काय असेल यांवर एकमेकांचे राजकीय भवितव्य अवलंबुन असेल. कारण संजय मंडलिक, संजय घाटगे, सतेज पाटील, विनय कोरे हे हसन मुश्रीफ यांच्या बाजुने भुमिका घेण्याची शक्यता असु शकते. तर संभाजी राजे छत्रपती, चंद्रकांतदादा पाटील, धनंजय महाडिक, पी.एन.पाटील, प्रकाश आवाडे, राजु शेट्टी, धैर्यशील माने, राजुबाबा आवळे, राजीव आवळे इत्यादी विविध पक्षांचे राजकीय नेते कोल्हापुर व कागलच्या राजकारणात मात्र समरजित घाटगे यांच्या बाजुने भुमिका घेवु शकतात. कारण याच्या पाठीमागील वैयक्तिक राजकीय गणिते व कोल्हापुर मधील शरद पवार गटाची झालेली सभा यांचा परिणाम, विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांची भुमिका ही वैयक्तिक हेवेदाव्यातुन व राजकीय अनुभवातुनच असु शकतात. तशीच जिल्ह्यातील व कागल तालुक्यातील दलित , ओबीसी व मुस्लिम समाजाची भुमिका देखील निर्णायक ठरु शकते. यातच दलित समाजामध्ये कागल तालुक्यातुनच हसन मुश्रीफ यांच्याविषयी वाढत असलेली नाराजी प्रखरतेने जाणवत नसली तरी समरजित घाटगे यांचा विजयश्री घडविण्यात महत्वाची भुमिका ठरु शकतात हे नाकारता येत नाही. कारण समरजित घाटगे, संजय घाटगे, संजय मंडलिक व हसन मुश्रीफ यांना मानणारा जस-जसा दलित वर्ग आहे. तसाच तो 2019 च्या निवडणुकीपासुन वंचित आघाडीकडे आकर्षित होणारा देखील दलित वर्गच आहे. याचा परिणाम देखील त्यावेळेस कोल्हापुर जिल्ह्याबरोबरच कागल मध्ये दिसला. कारण ऐनवेळी अपक्ष असलेले समरजित घाटगे व राष्ट्रवादीचे हसन मुश्रीफ, व भाजप शिवसेना युतीचे संजय घाटगे यांच्यामध्ये तिरंगी लढत झाली असली तरी, प्रत्यक्ष समरजित घाटगे व हसन मुश्रीफ यांच्यातच लढत प्रभावी ठरली. त्यावेळेस अँड.प्रकाश आंबेडकर यांनी सुरुवातीस वंचित आघाडीचा पाठींबा शाहु महाराजाचे वंशज म्हणुन समरजित घाटगे यांना पाठींबा दिला होता. मात्र घाटगे यांच्या भाजपविषयीच्या

जवळीकता व बदललेल्या भुमिकेमुळे वंचितने नंतर पाठींबा काढुन घेतला. त्यावेळेस जरी हसन मुश्रीफ निवडुन आले असले तरी भविष्यात समरजित घाटगे हेच हसन मुश्रीफांचे राजकीय प्रतिस्पर्धी म्हणुन विरोधात भुमिका घेवु शकतात. हे देखील त्यांना माहीती असावे. जरी भाजप सोबत आल्याने अजित पवार गटासोबत हसन मुश्रीफ गेले असल्याने समरजित घाटगे यांची राजकीय कोंडी केलेली आहे असे जरी वाटत असले तरी प्रत्यक्षात मात्र मुश्रीफ गट व समरजित घाटगे गट यांचे मनोमिलन होवु शकलेले नाही. व ते भविष्यात देखील होईल असे वाटत नाहि. कारण शासन आपल्या दरबारी यांसारखे कार्यक्रम मुश्रीफ गट व समरजित घाटगे गट यांचे वेगवेगळया स्वरुपाचे परस्पर होत असुन प्रत्येकजन आपापले कार्यकर्ते व लोक संघटित करताना दिसत आहेत.

कागल तालुक्यातुन मुश्रीफ गटाच्याच दलित समाजाची हसन मुश्रीफांविषयी वाढत असलेली नाराजी, व कोल्हापुर जिल्ह्यातुन शरद पवार गटाची होत असलेली नाराजी, आणि विविध राजकीय पक्षाच्या वैयक्तिक राजकीय हेवेदाव्यातुन होत असलेली राजकीय नाराजी, तसेच पुर्वी इडी चौकशी विषयक निर्माण झालेले प्रश्न याबाबत जनमानसांत निर्माण झालेली संभ्रवास्था, इत्यादींची तिव्रता जर का पाहिली तर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या समरजित घाटगे यांना कागल विधानसभा मतदार संघात निवडुन येण्यास त्यांना खुप मोठा फायदा होवु शकतो. तसेच हसन मुश्रीफ यांचे जिल्ह्यातील वर्चस्व कमी करण्यास शरद पवार गटाला तथापी जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांच्या नाराजांची भुमिका त्यापाठीमागे असल्याने हसन मुश्रीफ यांचा कागल विधानसभा मतदार संघात पराभव करण्याचा व त्यांचा विजयश्री तेथेच रोखण्याचा प्रयत्न हा अधिक केला जाईल. याला प्रमुख कारण त्याच्यांविषयीची वाढती नाराजी हेच असु शकते. व समरजित घाटगे यांना मिळत असलेला वाढता पाठींबा हा देखील भाग महत्वाचा असु शकतो. सध्या लोकसभेसाठी त्यांचे नाव चर्चेत असले तरी ते लोकसभा लढविण्याची शक्यता खुप कमी आहे. इंडिया आघाडीतुन शाहु महाराज छत्रपती हेच उमेदवार असतील तर महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक हेच असतील. एक मात्र अटळ आहे विधानसभा निवडणुकीत जरी कागल मतदार संघ अजित पवार गट,भाजप व शिंदे शिवसेना गट यांचे युतीचे उमेदवार म्हणुन अजित पवार गटाला जागा सोडल्यास त्यांचे उमेदवार हसन मुश्रीफ हेच असतील. तेव्हा त्यांच्या विरोधात प्रतिस्पर्धी म्हणुन समरजित घाटगे हेच अपक्ष उमेदवार म्हणुन पुढे येतील. याची जाणीव कदाचीत भाजप या राजकीय पक्षाला आहे. याचा फायदा प्रत्यक्षरित्या समरजित घाटगे यांना न भुतो न भविष्यतो असा होवु शकतो. हे बदललेल्या कागल व कोल्हापुरच्या राजकारणावरुन सिध्द होईल. तितकीच वंचित बहुजन आघाडीची भुमिका देखील तितकीच महत्वाची असेल हे देखील नाकारता येत नाही. याबाबत कागल मतदार संघाचे राजकारण सत्तेसाठी चाललेल्या संघर्षात कोणत्या बाजुने जाणार आहे हे जरी अस्पष्ट असले तरी भविष्यात ते अधिक स्पष्ट होवुन त्याची दिशा मात्र एका निश्चित राजकीय नेत्याकडेच केंद्रित होत असल्याने कागल तालुक्यातील सत्तापरिवर्तन होवु शकते. हे मात्र एक संशोधक व अभ्यासक म्हणुन दर्शवावे वाटते.

**सारांश-:**

1999 पासून सलग पाच वेळा निवडून येणारे हसन मुश्रीफ हे पश्चिम महाराष्ट्रातले एकमेव अल्पसंख्याक नेते जरी असले, 2014 व 2019 च्या निवडणुकीत मोदींचा प्रभाव असूनही हसन मुश्रीफ यांनी कागलची एकमेव जागा राखली असली तरी 2024 साली येवु घातलेल्या निवडणुकीत समरजित घाटगे यांचे कडवे आव्हान, यांशिवाय जिल्ह्यातील विविध पक्षांच्या नाराज नेत्यांचे, नाराज इतर समुदायांचे व नाराज दलित समाजाचे आव्हान हे खुप मोठे असु शकते, त्यांमध्ये वंचित बहुजन आघाडीची देखील भुमिका तितकीच महत्वाची आहे. तेव्हा कोणत्याच नेत्यांनी केवळ जनतेला मतांसाठी गृहित धरुन चालणार नाही. असे झाल्यास ते कागलच्या राजकारणात भविष्यात अपयशात्मक ठरेल. तेव्हा व्यापक पातळीवर लोकमत मिळवणे यांसाठी प्रयत्न करावा लागेल. अर्थात या जरी सर्व शक्यता असल्या तरी त्याची दिशा मात्र राजकीय घाडामोडीतुन अधिक स्पष्ट होत आहे. कागल मतदारसंघात समरजित घाटगे यांचे आव्हान ती दिशा आधोरेखीत करणारे ठरु शकते. हे आता नजीकच्या काळात पहावे लागेल. तर हसन मुश्रीफ आपली भुमिका कशी घेतात आणि नजिकच्या कालावधित नाराजांना व नाराज जात समुदायांना कशाप्रकारे विश्वासात घेण्याचा प्रयत्न करतात, आणि पुन्हा आपली प्रतिमा जनतेसमोर उभी करुन, कसे मात करु शकतात यांवर त्यांचे यशापयश अवलंबुन असेल. हे देखील आता पहावे लागेल. जरी असे असले तरी कागल मतदार संघात बदलणारे सत्तासमीकरण हे सत्तापरिवर्तनाच्याच दिशेने जात आहे.

**संदर्भ-**

1) भारतीय निवडणुक आयोग स्टँटीस्टीकल रिपोर्ट- (1962 ते 2019.)

2) - STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1962, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.91, 292

3) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1967, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.282, 324.

4) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1972, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.280, 321.

5) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1978, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.302, 357.

6) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1985, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.304, 366.

7) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1990, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.308, 401.

8) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1995, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.314, 446.

9) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTIONS, 1998 TO THE 12th LOK SABHA VOLUME I (NATIONAL AND STATE ABSTRACTS & DETAILED RESULTS) ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.220-221.

10) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTIONS, 1998 TO THE 12th LOK SABHA VOLUME II (CONSTITUENCY DATA - SUMMARY) ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.301.

11) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTIONS, 1999 TO THE THIRTEENTH LOK SABHA VOLUME II (CONSTITUENCY DATA - SUMMARY) ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.301.

12) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 1999, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.306, 360.

13) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTIONS, 2004 TO THE 14TH LOK SABHA VOLUME II (CONSTITUENCY DATA - SUMMARY) ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI,Page No.277.

14) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 2004, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.311, 394.

15) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTIONS, 2009 TO THE 15th LOK SABHA Part - II (CONSTITUENCY WISE DETAILED RESULTS), ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI,Page No.102.

16) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 2009, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.302, 460.

17) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 2014, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.311.

18) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTIONS, 2014 TO THE 16th LOK SABHA(CONSTITUENCY DATA - SUMMARY), ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI,Page No.270.

19) STATISTICAL REPORT ON GENERAL ELECTION, 2019, TO THE LEGISLATIVE ASSEMBLY OF MAHARASHTRA, ELECTION COMMISSION OF INDIA NEW DELHI, Page No.309.

20) भोळे, भा.ल," राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण", पिंपळापुरे प्रकाशन,प्रकाशन क्र.4, नागपुर, जानेवारी 2014,पृष्ठ क्र. 144 - 166

21) पाटील,वा.भा," राजकीय सिद्धांत", प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती,जळगांव, एप्रिल 2015, पृष्ठ क्र.42,44,62,68.

22) पवार प्रकाश,"भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल : राजकीयधुरीणत्व - वर्चस्व", डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, जानेवारी 2014, पुणे, पृष्ठ क्र.4, 8.

23) काचोळे, दा.धों, "राजकारणाचे समाजशास्त्र", कैलाश पब्लिकेशन्स, पुणे, जुन 1998, पृष्ठ क्र.147, 223

24) कुलकर्णी, बी.वाय,"राजकीय सिद्धांत", श्रीविद्या प्रकाशन, जुन 2003, पुणे, पृष्ठ क्र.166.

25) दै.सकाळ, दै.पुढारी, दै.लोकमत, वृत्तपत्र.इ.